आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - संध्याकाळी ७.०० वाजता
२ जुलै २०२६ - गुरुवार

**ठळक बातम्या**

- महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक विधानसभेत एकमतानं मंजूर
- राज्य सरकार सूरसम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवन गौरव पुरस्कार सुरू करणार
- केंद्रीय कृषीमंत्र्यांच्या हस्ते विकसित भारत जीरामजी योजनेचं औपचारिक उद्घाटन

**आणि**

- टीईटी पेपरफुटीप्रकरणी जम्मू आणि पाटण्यातून आणखी ३ जणांना अटक

**<><><><><>**

महिला शेतकरी सक्षमीकरण विधेयक आज विधानसभेत एकमतानं मंजूर झालं. या विधेयकाच्या माध्यमातून कोणाच्याही जमिनीच्या मालकी हक्कात बदल करण्याचा सरकारचा प्रयत्न नाही. केवळ त्यांच्या हक्काला, श्रमाला ओळख देण्याचा हा प्रयत्न असल्याचं प्रतिपादन उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विधानसभेत केलं. या विधेयकावरच्या चर्चेत त्या बोलत होत्या. हे विधेयक वारसा, उत्तराधिकारी, मालमत्तेसंदर्भातल्या विद्यमान कायद्यात बदल करत नाही. केवळ महिलांच्या कृषी क्षेत्रातल्या योगदानाला कायदेशीर मान्यता देण्याचा प्रयत्न असल्याचं त्या म्हणाल्या. या अंतर्गत मुख्यमंत्र्यांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण परिषद स्थापन केली जाईल. याशिवाय मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली राज्य संनियंत्रण समिती आणि कृषी सचिवांच्या अध्यक्षतेखाली महिला शेतकरी सक्षमीकरण कक्ष स्थापन केला जाईल.

संयुक्त राष्ट्रांनी २०२६ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला शेतकरी वर्ष म्हणून जाहीर केलं आहे. अशावेळी महिला शेतकऱ्यांना कायदेशीर ओळख देण्याचा प्रयत्न करण्यासाठी प्रयत्न करणारे महाराष्ट्र हे पहिले राज्य असल्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी सांगितलं. या विधेयकात शेतीची व्यापक व्याख्या केली आहे. यात

जमीन नसली तरी शेतीशी निगडित कामे करणाऱ्या महिलांना शेतकऱ्याचा दर्जा दिला जाणार आहे. त्यात पशूपालन, कुक्कुटपालन, मासेमारी, दूध उत्पादन यासारखी कामे करणाऱ्या महिलांना सुद्धा शेतकऱ्यांचा दर्जा मिळणार असल्याचे कृषिमंत्री म्हणाले.

**होल्ड - कृषीमंत्री दत्तात्रय भरणे बाइट**

हा कायदा लागू झाल्यावर महिला शेतकऱ्यांना ओळखपत्र दिलं जाईल. याच्या आधारे महिला शेतकऱ्यांना केंद्र आणि राज्य सरकारच्या विविध योजनांचा लाभ घेता येईल, त्यांना कृषीसाठी अर्थसहाय्य मिळेल, असं ते म्हणाले. यात एकल महिला शेतकऱ्यांवरही विशेष लक्ष दिले जाणार आहे. त्यामुळे सर्वांनी या विधेयकाला एकमतानं पाठिंबा द्यावा असं आवाहन त्यांनी चर्चेदरम्यान केलं होतं. त्याला सर्वपक्षीय सदस्यांनी पाठिंबा दिला आणि विधेयक एकमतानं मंजूर झालं.

**<><><><><>**

राज्यात विकसित भारत जी राम जी योजना लागू झाल्यानंतर ती सुलभ पद्धतीने राबवण्यासाठी, तसंच यात समाविष्ट केलेल्या जुन्या योजनेतल्या काही बाबी कशा प्रकारे अमलात येतील हे समजावून सांगण्यासाठी राज्यस्तरावर आमदारांसाठी कार्यशाळा आयोजित करण्यात येईल. याशिवाय प्रत्येक जिल्हा स्तरावर देखील ग्रामपंचायत सदस्य, पंचायत समिती सदस्य, जिल्हा परिषद सदस्य यांच्या साठी अशीच कार्यशाळा आयोजित करण्याचे निर्देश दिले जातील अशी माहिती प्रभारी मंत्री शंभुराज देसाई यांनी दिली.

राज्यातल्या गायन-संगीत क्षेत्रात आयुष्यभर उल्लेखनीय योगदान देणाऱ्या ज्येष्ठ आणि ख्यातनाम कलावंतांचा सन्मान करण्यासाठी सांस्कृतिक कार्य विभाग सूरसम्राज्ञी आशा भोसले संगीत जीवन गौरव पुरस्कार' सुरू करणार असल्याची घोषणा सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांनी विधानसभेत केली. हा पुरस्कार १० लाख रुपयांचा असेल, असं त्यांनी संगितलं.

**<><><><><>**

मराठी भाषेला अभिजात भाषेचा दर्जा मिळाल्यानंतर मराठी भाषा भवनाचं काम वेगानं सुरू असून डिसेंबर २०२७ पर्यंत त्याचं काम पूर्ण होईल, तसंच ऐरोलीत भाषा उपकेंद्राचं कामही प्रगतीपथावर आहे, अशी ग्वाही मराठी भाषा मंत्री उदय सामंत यांनी आज विधानपरिषदेत दिली. बाळासाहेब ठाकरे यांच्या जन्मशताब्दी वर्षानिमित्त त्यांच्या नावानं नाशिक, छत्रपती संभाजीनगर, अमरावती, नागपूर, चंद्रपूर, पुणे, कोल्हापूर आणि रत्नागिरी या पहिल्या ८ ठिकाणी मराठी भाषा विकास केंद्रं स्थापन करायचा निर्णय सरकारनं घेतला असून एका वर्षात त्याची अंमलबजावणी होईल. जिल्हास्तरावर भाषा अधिकारी नेमायचा निर्णय घेतला असून एका महिन्यात त्याची अंमलबजावणी होईल, असं सामंत म्हणाले.

लंडनमध्ये छत्रपती शिवाजी महाराजांच्या नावाने आंतरराष्ट्रीय वैश्विक मराठी केंद्राची कारवाई २ वर्षांत पूर्ण होईल, असं आश्वासन त्यांनी दिलं. आंतरराष्ट्रीय स्तरावर मराठी मंचाची स्थापन करण्याविषयी सामंत म्हणाले…

**होल्ड.. बाईट - उदय सामंत**

ज्ञानेश्वरी, तुकाराम गाथा, निवृत्तीनाथ, निळोबाराय यांचं साहित्य घरोघरी पोचण्यासाठी विभागाने पुढाकार घेऊन अनुदान मंजूर केल्याचा उल्लेखही सामंत यांनी केला.

**<><><><><>**

वेरूळ इथले शिक्षक सुरेश बोरसे यांना वैजापूरचे तपास अधिकारी आणि इतरांनी जबर मारहाण केल्याच्या आणि या घटनेत त्यांचा मृत्यू झाल्याप्रकरणी दोन पोलीस कर्मचाऱ्यांना सेवेतून निलंबित केलं असल्याची माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी विधानपरिषदेत दिली. या प्रकरणी एकंदर ८ आरोपींविरुद्ध गुन्हा दाखल केला असून ७ आरोपी अटकेत आहेत, असंही त्यांनी सांगितलं.

शेती आणि गैरव्यवसायिक कामासाठी गौण खनिजाचा वापर करण्यासाठी स्वामित्व शुल्क माफ करण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. या गौण खनिजाचा वापर शेती, शेतघर, शेत रस्ता दुरुस्ती, गोठा वगैरे गैरव्यवसायिक कामासाठी करता येईल अशी माहिती महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी दिली. यासाठी शेतकऱ्यांना मंडळ अधिकाऱ्यांकडे अर्ज करावा लागेल आणि १५ दिवसात त्यांना मंजुरी मिळेल, असं बावनकुळे यांनी सांगितलं.

**<><><><><>**

केंद्रीय कृषी मंत्री शिवराज सिंह चौहान यांच्या हस्ते आज विकसित भारत जी राम जी योजनेचं औपचारिक उद्घाटन झालं. आंध्र प्रदेशाच्या तिरुपती जिल्ह्यात झालेल्या कार्यक्रमात आंध्र प्रदेशचे मुख्यमंत्री एन चंद्राबाबू नायडू आणि उपमुख्यमंत्री पवन कल्याण उपस्थित होते. यावेळी लाभार्थींना जी राम जी कार्डांचं वाटप करण्यात आलं. तसंच जी राम जी पोर्टलचं उद्घाटनही झालं.

जुन्या मनरेगा कायद्याची जागा घेणारा हा कायदा कालपासून देशात लागू झाला आहे. मनरेगा आणि या योजनेतला फरक सांगताना कृषीमंत्री चौहान यांनी सांगितलं…

- **- - - होल्ड - बाईट- शिवराजसिंग चौहान- - - -**

**<><><><><>**

भिवंडीतील चर्चित टीईटी पेपर लीक प्रकरणात ठाणे गुन्हे अन्वेषण विभागाने आणखी तीन आरोपींना अटक केली आहे. फरार आरोपी कपिल दहिया याच्याविरोधात लुकआऊट नोटीस जारी करण्यात आली होती. त्यानंतर ठाणे पोलिसांनी जम्मू इथून त्याला अटक केली. तसंच या प्रकरणाशी संबंधित आणखी दोन आरोपी सोनू सिंह आणि मिथुन सिंह यांना बिहारमधील पटणा इथून ताब्यात घेण्यात आल्याची माहिती पोलीस उपायुक्त डॉक्टर पवन बनसोड यांनी आकाशवाणीला दिली.

**<><><><><>**

अनुसूचित जमाती जात पडताळणी प्रक्रिया अत्याधुनिक तंत्रज्ञानाच्या साहाय्याने अधिक पारदर्शक, सुलभ, विश्वासार्ह आणि लोकाभिमुख करावी. ब्लॉकचेन तंत्रज्ञानाचा वापर करून सर्व जात वैधता प्रमाणपत्रांचे सुरक्षित डिजिटल पडताळणी व्यवस्थेत रूपांतर करण्याचे निर्देश मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दिले. ते आज विधानभवन इथं महाराष्ट्र राज्य जनजाती सल्लागार परिषदेच्या ५२ व्या बैठकीत बोलत होते.

**<><><><>**

मुंबईत साकीनाका परिसरात आज एका व्यक्तीचा मॅनहोलमध्ये पडून मृत्यू झाला. मॅनहोलवर जाळी बसवण्याचे काम सुरू असताना ही व्यक्ती मोबाइलवर बोलत तिकडून जात होती. त्यावेळी मॅनहोलमध्ये पडून तिचा मृत्यू झाला. तिच्या कुटुंबियांना १० लाख रुपयांची आर्थिक मदत महापौर रितू तावडे यांनी जाहीर केली आहे. तर कामात हलगर्जी केल्याप्रकरणी मुंबई महापालिकेनं सहाय्यक आयुक्तांसह ३ अभियंत्यांना निलंबित केलं आहे. येत्या ८ दिवसात सर्व मॅनहोलची पाहणी करुन त्याठिकाणी सुरक्षेची व्यवस्था करण्याचे आदेश पालिका आयुक्तांनी दिले आहेत.

**<><><><>**

गेल्या २४ तासात कोकणात बहुतांश ठिकाणी जोरदार पाऊस पडला, तर तुरळक ठिकाणी अतिवृष्टी झाली. विदर्भात अनेक ठिकाणी, तर  मराठवाडा आणि मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस पडला. तुरळक ठिकाणी जोरदार पाऊस पडला. येत्या दोन दिवसात कोकण आणि विदर्भात बहुतांश ठिकाणी, तर मध्य महाराष्ट्र आणि मराठवाड्यात अनेक ठिकाणी पाऊस पडण्याची शक्यता हवामान विभागानं व्यक्त केली आहे.

**//<><><><><>//**